UGC Sponsored National Seminar

on

Role of Values in Present Life



-: Editor :-

Mr. Prabhakar Kirtankar

Organized by

Department of Philosophy

Swatantrya Sainik Suryabhanji Pawar College, Purna (Jn.)

Dist. Parbhani 431 511 [M.S.] India

Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

UGC Sponsored
One-Day National Seminar
On
"Role of Values in Present Life"
19 December, 2014

Dr. Vaijnath Kirtankar Personal Book Bank

Editor-in-Chief
Mr. Prabhakar Kirtankar
Head, Dept. of Philosophy
Swatantrya Sainik Suryabhanji Pawar College,
Purna (Jn.) Dist. Parbhani

Editorial Board
Dr. Sharda Bande
Principal
Swatantrya Sainik Suryabhanji Pawar College, Purna (Jn.)

Dr. Surendra Gaidhane
(Nagpur)

Prof. Baban Satpute
(Basmat)

Organized by

Department of Philosophy
Swatantrya Sainik Suryabhanji Pawar College,
Purna (Jn.) Dist. Parbhani

Chief Patrons

Hon. Dr. Rameshwar Pawar
Founder Secretary

Hon. Shri. Gulabrao Kadam
President

Anusaya Shikshan Prasarak Mandal, Parbhani

Published by:
The Principal
Swatantrya Sainik Suryabhanji Pawar College,
Purna (Jn.) Dist. Parbhani (M.S.)

© The Principal, Swatantrya Sainik Suryabhanji Pawar College,
Purna (Jn.) Dist. Parbhani (M.S.)

Year of Publication
19, December, 2014

Publisher:
The Principal
Swatantrya Sainik Suryabhanji Pawar College,
Purna (Jn.) Dist. Parbhani (M.S.)

ISBN - 978-81-921456-4-8

Printed at : **Akshada Services, Parbhani**

*** Views expressed in this proceeding are of the individual Authors/ Researchers and not of the chief editor or publishers. No part of this book may be reproduced or translated in any form without the prior permission in writing from the copyright owner*

INDEX

S.N.	Research Paper Title		Page No.
i	Message from the Secretary		05
i	Message from Principal		06
i	Preface		07
1	**Role of Value in Present life**	Dr. Sangeeta Pande	09
2	**Can't Values Be Imparted in Classrooms ?**	Dr. Sunil Salunke, Vijay Srinath Kanchi	13
3	**Value System & Beliefs**	Narendra V. Raghatate	17
4	**Importance of Moral Values in Present Life**	Hadule Dhanraj	21
5	**Importance of Values in Present Life**	Kadam V.G., Pawar D.A.	22
6	नैतिक मूल्ये बोध और चिकित्सक – एक विमर्ष	डॉ. सविता गुप्ता	24
7	डॉ. भीमराव अम्बेडकर का सामाजिक मानवतावाद	रमेश रोहित	27
8	बुद्धोपदिष्ट मैत्री ब्रम्हविहार भावना एक सामाजिक परिदृश्य	लोकेश कुमार	30
9	मूल्यविवेक	प्रा.डॉ.ज.रा.दाभोळे	34
10	मुल्यांच्या सत्ताशास्त्रीय स्थितीविषयी	सुरेन्द्र गायधने	36
11	मुल्यांच्या स्वरूपाविषयी	डॉ. सुनिता इंगळे	37
12	बदलती सामाजिक मुल्य व्यवस्था एक अभ्यास	डॉ. राजेसाहेब मारडकर	38
13	भगवान गौतम बुद्धांचे धर्मचक्रप्रवर्तन कार्य	प्रा.सुनिल एस. गवरे	41
14	वर्तमान जीवनात नैतिक मूल्यची भूमिका	प्रा.शैलेजा अनंत खोरगडे	43
15	पर्यावरणीय नीतिशास्त्र : एक तात्वीक आढावा	डॉ. संजय पाटील	46
16	मूल्याचे मापदंड	प्रा.दिवे वैशाली माधवराव	51
17	प्राचीन भारतीय संस्कृतीचा अध्यात्मिक दृष्टकोण आणि पर्यावरणाचे संरक्षण	प्रा. सीमा देशपांडे	43
18	मुल्य शिक्षण	प्रा. सातपुते एस.बी.	57
19	भारतीय दर्शनातील मूल्य संकल्पना	वृषाली ओंकार आंबटकर	60
20	नैतिक व्यवस्थाः जीवन मूल्यों के संदर्भ में पुरूषार्थ	डॉ. राहुल वर्मा	63

S.N.	Research Paper Title		Page No.
21	मुल्यः 'साधन रूप व साध्यरूप'	प्रा.भुसारे जी.एन	66
22	मूल्य विचार	प्रा.सो.भुसारे एस.आर.	68
23	बुद्धांच्या नैतिक तत्त्वज्ञानातील 'आर्थिक व सामाजिक विचार'	प्रा.लझडे धनराज तुकाराम	71
24	नैतिक मूल्य	डॉ.खलील नसीसाब सय्यद	74
25	प्रा. मे. पुं. रेगे – अध्यात्म आणि ऐहिकता (आध्यात्मिक आणि ऐहिक मूल्यांचा समन्वय)	प्रा.डॉ.नवनाथ रासकर	76
26	समाजविकासात मूल्याची भुमिका	प्रा. स्वामी जयश्री जयतीर्थ	79
27	मूल्याशिक्षणात शिक्षकाची भूमिका	प्रा. कांबळे माधव नरहरी	82
28	मुल्य शिक्षण	डॉ. शेडगे विजय, कांबळे उद्धव	85
29	महात्मा गांधीचे अहिंसाविषयक विचार	प्रा. कुलकर्णी सुरेखा भालचंद्र	87
30	मुल्यांचा आधुनिक संदर्भात केलेला चिकित्सक विचार	प्रा. मनोज उत्तमराव पाटील	89
31	मूल्याधिष्ठित शिक्षण काळाची गरज	मारूती दत्तराव आवरगंड	92
32	वर्तमान जीवनात 'मूल्याचे' महत्त्व	शेख मुबिन फत्रुमियाँ	93
33	मूल्य व आजचा युवक	श्री. नरवाडे बी.एम.	95
34	आर्थिक नैतिकमुल्य	प्रा.डॉ.प्रमोद डी. वैद्य	99
35	शिक्षण प्रक्रियेत मानव व मानवी मुल्यांचे महत्त्व	प्रा. अमन बगाडे	101
36	मूल्य संकल्पना	प्रा.सौ.स्वाती नागोराव कुलकर्णी	106
37	मानवी जीवनात नैतिक मूल्यांना स्थान	प्रा. उप्पलवार एस.बी.	109
38	मानवी जीवनात मूल्याचे स्थान	डॉ.वेदप्रकाश डोणगांवकर	112
39	गांधीजींच्या मूल्यविषयक विचारांची सद्यकालीन उपयुक्तता	प्रा.सुवर्णा टेकाळे (वाले)	115
40	मानवी जीवनात मूल्याचे स्थान	डॉ. ग्यानदेव उपाडे	118
41	मानवीजीवनात शैक्षणीक मुल्यांचे महत्व	प्रा.जगन्नाथ विठ्ठलराव कदम	122
42	सद्यस्थितीत मूल्याचे महत्त्व	प्रा. राजेश रामटेके	125

मानवी जीवनात मूल्याचे स्थान

डॉ.वेदप्रकाश डोणगांवकर
तत्वज्ञान विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे महा. वाशिम

प्रस्तावना :

ज्याला व्यावाहारिक जगतामध्ये किंमत, महत्व संबोधले जाते, त्यालाच तात्विक भाषेमध्ये मूल्य म्हटले जाते. मूल्य हा शब्द आदर्शवादी शब्द आहे. ज्याला इंग्रजीमध्ये Value असे म्हणतात. Value हा शब्द लॅटीन भाषेतील Value या शब्दापासून बनला आहे. ज्या शक्ती, आरोग्य असा अर्थ होतो. फ्रेंच भाषेमध्ये Value या शब्दासाठी Value हा शब्द रुढ आहे. ज्याचा अर्थ चांगूलपणा असा होतो. एकंदर किंमत, महत्व, शक्ती, आरोग्य, चांगूलपणा इत्यादी शब्दाला किंवा इत्यादी शब्दाला अनुसरून ज्या वस्तू असतात त्या वस्तूला मूल्य म्हणतात. पण या ठिकाणी एक प्रश्न उपस्थित होतो की, नेमके कोणकोणत्या वस्तूला मूल्य म्हणून स्वीकारले पाहीजे ? कोणती वस्तू ही नेमकी कोणासाठी मूल्य ठरणारी असते ? हे दोन्ही प्रश्न ज्या व्यक्ती वा समाजाला अनुसरून आहेत, ती व्यक्ती वा समाज उपयुक्तता (Utility) आणि योग्यता (Appropriateness) यांच्या आधारावर विशिष्ट वस्तूला विशिष्ट व्यक्ती व समाजाच्या संदर्भात मूल्य म्हणून निश्चित करीत असते. अर्थातच मूल्य ही व्यक्ती सापेक्ष असतात. नित्य स्वरुपात कोणते ही एक मूल्य मानवी जीवनात स्वरुपत: अस्तित्वात नसते. परंतू या ठिकाणी हे सुध्दा लक्षात घेतले पाहिजे की, मानवी जीवनातील अशी एकही अवस्था नसते की त्या अवस्थेमध्ये मानवासाठी काहीही मूल्य म्हणून नसते. एंकदर मूल्य ही अस्तित्व रुपाने नित्य आणि निरपेक्ष आहेत. मात्र स्वरुप रुपाने ते अनित्य आणि सापेक्ष आहेत.

मुल्याचा आधार :

वास्तविक पाहता मूल्याचे जे निर्धारण झालेले असते ते मानवी बुध्दीच्या वा भावनेच्या आधारेच झालेले असते. सामान्यत: मानव आदर्शाच्या किंवा शुभत्वाच्या स्थापनेसाठी, आत्माज्ञानासाठी किंवा सुखासाठी असतो. म्हणजे मानव भौतिक-अभौतिक, स्वार्थ-परमार्थ या विषयाला अनुसरुन आपले कार्य करीत असतो. मानवी बुध्दी आपले ध्येय गाठण्यासाठी ज्या ज्या घटकांचा आधार घेते ते सर्व घटक मानवासाठी मूल्य ठरतात. किंबहुना मानव त्या घटकांना मूल्य म्हणून ठरवितो. एकंदर अस्तित्वात असलेल्या आणि निर्माण होणाऱ्या प्रत्येक मूल्याचा आधार मानवी बुध्दी किंवा मानवी चेतना हीच असते.

मूल्याचा उद्देश :

मूल्य कशाला लागतात ? अया प्रश्न जेव्हा उपस्थित होतो तेव्हा त्या मागे काही तरी उद्देश असतो हे आपल्याला लक्षात येते. सामान्यत: गरज किंवा आवश्यकतेमुळे मूल्याची निर्मिती होते असे आपल्याला दिसून येते. परंतू प्रत्येक गरज वा आवश्यकते मागे संकल्परुपात एक उद्देश अंतर निहित असतो. मानवी स्वभावाचे विश्लेषण केले असता हे लक्षात येईल की प्रत्येक व्यक्ती सुख (Pleasure) किंवा आनंद प्राप्त करण्याचा उद्देश बाळगूण असतो. एंकदर सुख किंवा आनंद प्राप्त करने हाच मूल्य निर्मिती मागचा उद्देश असतो.

मूल्याचे क्षेत्र :

मूल्य किती आहेत ? मूल्य कोणती आहेत ? या प्रश्नाचे आजचे उत्तर काहीसे अनिश्चित आहे. कारण मूल्यांची निर्मिती आवश्यकतेनूसार होत असतानाचे चित्र आपण पाहत आहोत. प्राचीन काळामध्ये धर्म, अर्थ, काम, मोक्ष, वर्णाश्रम, स्वधर्म, पाच महाव्रत, अष्टांगीक मार्ग, यम-नियम, याशिवाय सुखवाद या सारख्या घटकांचा भारतीय परंपरेत मूल्याच्या रुपात विचार झाला आहे. पाश्चात्य परंपरेत सुध्दा सुखाला आणि सद्गुणाला

मूल्य मानले गेले होते. याठिकाणी विचार करण्यासारखी बाब ही आहे की, या सर्व मूल्यांचे अस्तित्व मानवी अस्तित्वाला अनुसरुनच आहे. तेव्हा आजच्या मानवी अस्तित्वाचा विचार केला असता आपल्या लक्षात येईल की, मानवी जीवन अधिकाधिक गुंतागुंतीचे बनले आहे. ज्यात वर उल्लेख झालेल्या मुल्यांपैकी काही मूल्य साध्य तर काही मूल्य त्याच साध्याची साधन असल्याचे जाणवत आहे. विशेष म्हणजे ज्याला साधन म्हणून स्वीकारले जाते ते विशिष्ट परिस्थितीत वा क्षेत्रात साध्य ठरते. उदाहरणार्थ आध्यात्मिक क्षेत्रात सत्य हे मोक्ष प्रज्ञप्तीचे एक साधन आहे. मात्र हेच सत्य कायद्याच्या क्षेत्रामध्ये साध्य ठरते. अर्थात मुल्याचा प्रकारा ऐवजी मुल्यांचा क्षेत्राचा विचार होणे आज आवश्यक बनले आहे आणि त्यानुसार वैयक्तिक, सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक, वैज्ञानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्राला अनुसरुन मूल्ये किती व कोणती हे ठरवावे लागेल.

मूल्याचे स्वरुप व भेद :

वास्तवीक पाहता मूल्य हे मूल्य आहेत. त्यांच्यात मुलत: कोणताही भेद नसतो. पण मानवी प्रवृत्ती, मानवी गरजा, आवश्यकता इत्यादीचा विचार केला असता स्वाभाविकपणे मुल्यामध्ये भेद होतो. सामाजिक जीवनात आपण पाहतो ही लोक निरनिराळ्या स्वभाव आणि वृत्तीचे असतात. त्यात काही शांत, हिं आक्रमक, काही सांसारिक तर काही सन्यासी असतात. या प्रत्येकाचा स्वभाव किंवा वृत्ती निरनिराळ्या उद्देशाने प्रभावीत असते. आपल्या उद्देशा पर्यंत पोहचण्यासाठी प्रत्येक व्यक्ती निरनिराळ्या साधनांचा किंवा मुल्यांचा उपयोग आपल्या आचरणात करीत असतो. उदा. शांत व्यक्ती दया, क्षमा, संयम या सारख्या साधन मूल्याचा मर आक्रमक व्यक्ती क्रोध, हिंसा, बळ या सारख्या साधन मूल्यांचा आपल्या आचरणात उपयोग करीत असतो. मानवतावादी दृष्टिकोनातून आक्रमक स्वभावाला महत्व नसेल परंतू तरीही तो राजकीय क्षेत्रात स्वागतार्ह असतो. एकंदर मानवी स्वभाव, मानवी आवश्यक्तांना अनुसरुन या ठिकाणी जी सापेक्षता निर्माण झाली आहे ती पाहता शुभ मुल्य वा विधायक मुल्य आणि अशुभ मुल्य वा विघातक मुल्य असा मुल्यांचा एक भेद करता येईल.

मुल्यांचा संदर्भात निरपेक्ष आणि सापेक्ष असाही एक भेद केला जातो. परंतू मुल्य ही केवळ सत्ताशास्त्रीय दृष्टिकोनातून निरपेक्ष दिसतात. आचरणाच्या संदर्भात मुल्यांची ही निरपेक्षता नित्य रुपाने कधीही दिसून येत नाही. म्हणून निरपेक्ष मूल्य आणि सापेक्ष मूल्य असा भेद करण्या योग्य आहे की नाही ? हा एक स्वतंत्र प्रश्न आहे असे म्हणावे लागेल.

निरपेक्ष आणि सापेक्ष प्रमाणे नित्य आणि अनित्याच्या भेदाचाही प्रश्न उपस्थित होतो. कारण सत्य हे मूल्य म्हणून जर अपण स्वीकारले तर देश, काळ, स्थिती मध्ये ते सत्य अस्तित्व रुपात सत्य असेल. परंतू त्याचे स्वरुप हे अनित्य असेल. म्हणजे भुतकाळातील एखादी भूमिका योग्य किंवा एखादी घटना सत्य होती असे म्हणत असतांना वर्तमान किंवा भविष्यात तशीच भुमिका घेतल्यास किंवा त्याच परिस्थीतीचे पुन: परीक्षण केल्यास ती योग्य किंवा सत्य ठरेल असे म्हणता येणार नाही. उदा. प्राचीन काळापासून नैतिक शिक्षण ही काळाची गरज असते. अशा प्रकारची भुमिका घेण्यात आली होती आणि ती योग्य सुध्दा होती. परंतू आज Kiss of Love या युवा चळवळीने नैतिक शिक्षणासारखा प्रकार नलादण्या संबंधीची आग्रही भुमिका घेतली आहे आणि यामुळे नैतिक शिक्षण काळाची गरज असते. ही भुमिका घेणे भविष्यात योग्य ठरेल की नाही हे सांगता येणार नाही.

दुसरे उदाहरण आहे ते असे की, हिंदू परंपरेनुसार मंगळसूत्र हे सौभाग्याचे प्रतिक आहे. पत्नीने ते आपल्या पूसन दूर क़रावयाचे नसते. परंतू आज आपल्या समोर वाशीम जिल्ह्यातील एक उदाहरण आहे की, एक संगिता आव्हळे नावाची महिला सामाजिक आरोग्य सुरक्षीत रहावे म्हणून सौभाग्याचे प्रतीक असलेले मंगळसुत्र विकून आपल्या घरी शौचालय बांधण्याची भुमिका घेते. यावरुनही आपल्याला असे म्हणावे लागेल की, भुतकाळात मूल्य म्हणून जे काही निश्चित झाले आहे त्यात वर्तमानात बादल णाला असल्यामुळे, आज दिसून येत असलेले स्वरुप भविष्यात असेच राहील की नाही हे सांगता येणार नाही. परंतू भविष्यात मंगळसुत्र अर्थात सोने अस्तित्वात असेल आणि त्यालाही हिं ततरी वेगळे महत्व असेल.

एंकदर मूल्य अस्तित्व रुपाने आणि नित्य आहेत तर स्वरुपत: सापेक्ष आणि अनित्य आहेत. या ठिकाणी आणखीन एक बाब लक्षात घेण्याजोगी आहे ती अशी की, प्राचीन धर्म परंपरेनुसार मंगळसुत्राची जपवणुंक करने हे स्त्रीचे कर्तव्य आहे. म्हणजेच प्राचीन परंपरेनुसार मंगळसुत्र साध्य मुल्य होते. मात्र हेच मंगळसुत्र आज शौचालय बांधण्याच्या उद्देशासाठी साधन मुल्य ठरले आहे. अर्थात साध्य मुल्य आणि साधन मुल्य असाही एक भेद करता येईल.

निष्कर्ष :

तात्विक आणि व्यावहारीक दृष्टिकोनातून मानवी जीवनात मूल्याचे एक विशेष महत्व आहे. वास्तविक पाहता मूल्याचे स्वतंत्र असे अस्तित्व नसते. परंतू मानवी जीवन मूल्यांचा आधारेच विकसीत होत असते. मुल्याची निर्मिती मानवी चेतनातून (बुध्दी आणि भावना) झाली आहे. आणि मानवी चेतनाणेच ही मूल्य अस्तीत्ववान असतात. मात्र मुल्यांचा प्रभाव आपल्याला बाह्य जगतात पाहवयास मिळतो.

मूल्याचे अस्तित्व निरपेक्ष आणि नित्य आहे. परंतू मानवी आचरणामध्ये मूल्याचे स्वरुप कसे आहे ? म्हणून जेव्हा आपण पाहतो तेव्हा ते सापेक्ष आणि अनित्य असल्याचे जाणवते. मानवी प्रवृत्ती, मानवी स्वभाव आणि त्याला अनुसरुन निर्माण झालेली गरज किंवा आवश्यकता हीच मुल्याचा सापेक्षतेचे, अनित्यतेचे कारण आहे आणि या कारणामुळेच विधायक वा शुभ मूल्य आणि विघातक वा अशुभ मूल्य असा भेद पाहवयास मिळतो.

मूल्य ही परिवर्तणीय असतात, त्यांच्यात क्रम परिवर्तन होत असतो. म्हणजेच विशिष्ट असे मूल्य विशिष्ट अश्या क्षेत्राला अनुसरुन साध्य ठरत असेल तर तेच मूल्य दुसऱ्या कुठल्या तरी क्षेत्राला अनुसरुन साधन ठरत असते. म्हणून मूल्या संदर्भात आग्रही भुमिका घेणे सुध्दा अनावश्यर्क आणि अप्रासंगिक ठरते.

संदर्भग्रंथ :

१) तत्वज्ञानाच्या मूलभुत समस्या, दि.य.देशपांडे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, ११९०

२) दर्शन का परिचय, राजेंद्र स्वरुप भटनागर, राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी, जयपुर, १९९३

३) तत्वज्ञानाची रुपरेषा, लेख प्रा.ई.आर.मठवाले, म.त.प. २००९

४) स्वातंत्रता, मूल्य और परंपरा, धर्मेंद्र गोयल, विश्वविद्यालय प्रकाशन सागर, २०१२